लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !
25th April 2020

# परिघावर जगणाऱ्यांची 'टाळेबंदी'



**सध्याच्या टाळेबंदीनं देहविक्रय करणाऱ्या देशभरातील लाखो लोकांच्या रोजच्या उदरनिर्वाहाचा, मानसिक स्वास्थ्याचा, आरोग्याचा आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**

**मीना शेषू – meenaseshu@gmail.com**

'करोना'च्या प्रादुर्भावाची चर्चा सुरू झाली तेव्हाच त्याचा मोठा फटका वेश्या व्यवसायातील व्यक्तींना बसणार, याची जाणीव झाली. हा व्यवसाय त्यांच्यासाठी जास्तीचा पैसा कमावण्यासाठीचा नसून हे त्यांच्या उपजीविकेचं साधन आहे. त्यामुळे सध्याच्या टाळेबंदीनं देहविक्रय करणाऱ्या देशभरातील लाखो लोकांच्या रोजच्या उदरनिर्वाहाचा, मानसिक स्वास्थ्याचा, आरोग्याचा आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

करोना विषाणूच्या प्रादुर्भावाचा सर्वच पातळ्यांवर मोठा परिणाम झाला आहे. या विषाणूचा प्रसार लोकांच्या परस्परांशी येणाऱ्या संबंधांवर अवलंबून आहे. त्यावर उपाय टाळेबंदीचा! संपूर्ण संचारबंदी लागू करून माणसं माणसांपासून दूर ठेवायची, असा हा उपाय आहे. मात्र समाजात असे अनेक घटक आहेत, की ज्यांचं उपजीविकेचं साधनच माणसांच्या संपर्काशी निगडित आहे. वैद्यकीय व्यवसायाव्यतिरिक्त व्यक्तींच्या प्रत्यक्ष संपर्कावर अवलंबून असणारे ब्युटी पार्लर, मसाज पार्लर, केशकर्तनालयं आदी व्यवसाय यामुळे संकटात आले आहेत. वेश्या व्यवसाय हा असा एक व्यवसाय आहे, ज्यात काम करणाऱ्या अनेकींच्या उपजीविकेचं ते साधन

आहे. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असणारा  मोठा घटक टाळेबंदीमुळे अडचणीत आला आहे. हे संकट अजून किती काळ घोंघावत राहणार आहे, याबद्दलच्या अनिश्चिततेमुळे लाखो स्त्रियांचं भवितव्यही अधांतरी आहे.

टाळेबंदीमुळे माणूस एकमेकांच्या जवळ यायला तयार नाही, किंबहुना तो परस्परांच्या संपर्कात येऊ नये, हाच हा विषाणू रोखण्यापासूनचा एकमेव इलाज असल्याने करोना विषाणूचा संसर्ग संपला तरी हा विषय संपणार नाही. तो अदृश्य रूपात संसर्ग करीत कुठे ना कुठे असणार आहे. पुढच्या सहा महिन्यांत किंवा वर्ष-दोन वर्षांत किं वा या विषाणूला अटकाव करू शकणारी लस निघेपर्यंत लैंगिक सेवा देणाऱ्या वेश्या व्यवसायासारखे व्यवसाय संकटात राहणार आहेत. वेश्या व्यवसायावर स्वतःचं कुटुंब चालवणाऱ्या लाखो स्त्रिया आपल्या देशात आहेत. वेश्यागमन करणारा किंवा तो कायमचा सवयीचा भाग बनलेला पुरुष वर्ग त्याहून किती तरी  पटीनं अधिक आहे.  सांगलीची 'संपदा ग्रामीण महिला संस्था' ('संग्राम') गेली तीस र्वष, म्हणजे विशेषतः ज्या काळात 'एचआयव्ही- एडस्'चा प्रादुर्भाव सुरू झाला तेव्हापासून महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकातील वेश्या व्यवसायात असलेल्या स्त्रिया, तृतीयपंथी व्यक्ती आणि या व्यवसायातील व्यक्तींची मुलं यांच्याबरोबर प्रामुख्यानं वैद्यकीय सेवेच्या संदर्भात काम करत आहे. याच स्त्रियांनी एकत्र येऊन 'वेश्या अन्याय मुक्ती परिषद' ('व्हॅम्प') ही संस्था स्थापन केली. राज्य शासनाचे अनेक प्रकल्प राबवण्याचं काम या माध्यमातून केलं जातं. एचआयव्ही- एडस्चा प्रसार रोखण्यात या स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे. एके काळी वस्तीत किंवा रात्री रस्त्याच्या कडेला उभ्या राहून हा  व्यवसाय करणाऱ्या या स्त्रिया आता शासनाचे प्रकल्प राबवणाऱ्या आरोग्यसेविका झाल्या आहेत. विविध राज्यांत काम करणाऱ्या स्त्रियांनी एकत्र येऊन 'नॅशनल नेटवर्क ऑफ सेक्स वर्कर्स' ही शिखर संस्थाही सुरू केली आहे. 'कोविड १९' विषाणू जेव्हा चर्चेत आला तेव्हाच याचा मोठा फटका वेश्या व्यवसायातील लोकांना बसणार, याची जाणीव झाली होती. हा व्यवसाय त्यांच्यासाठी अधिकचा पैसा कमावण्यासाठीचा नसून जगण्याचं, किंबहुना उपजीविकेचं साधन आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत या लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न, तसंच मानसिक स्वास्थ्याचे प्रश्नही उपस्थित होणार, याची जाणीव झाली होती. स्त्रियांमध्ये यावर चर्चा सुरू झाली होती. ज्या स्त्रिया विविध आजारांवर उपचार घेत आहेत, त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध होणार का, ज्यांना 'एचआयव्ही' साठी उपचार चालू आहेत, त्यांना वैद्यकीय सेवा शासकीय रुग्णालयातच मिळते. ती चालू राहणार का, असे असंख्य प्रश्न उभे राहिले. माणसाचे रोजचे व्यवहार हे रोजच्या उपजीविकेशी थेट निगडित असले की त्यावर प्रसंगी किती तीव्र परिणाम होतो, हे चार आठवडय़ांच्या टाळेबंदीनं समोर आलं. ते अधिकच तीव्र झाले आहेत. स्थलांतरित मजुरांच्या प्रश्नानं किती गंभीर वळण घेतलं, हे आपण अनुभवतच आहोत.

'संग्राम' आणि 'व्हॅम्प' या संस्थांनी टाळेबंदी जाहीर होताच उद्भवणाऱ्या संभाव्य परिस्थितीचा अंदाज बांधला. किमान जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा आणि औषधोपचार याला प्राधान्य द्यायची चर्चा सुरू झाली. वस्ती-वस्तीत तणाव वाढत होता. कारण या वस्त्या व्यवसायासाठी संध्याकाळी माणसांनी भरून जात होत्या. त्या आता स्मशानशांततेनं खायला उठत होत्या. याची सवयच नव्हती. एखादा दिवस 'भारत बंद' किंवा 'महाराष्ट्र बंद'ची या स्त्रियांना सवय होती. तसं असतानाही दिवस मावळला की वस्त्या ओस पडत नव्हत्या. कारण संचारबंदी नव्हती. टाळेबंदीमुळे या स्त्रियांना फार मोठा मानसिक धक्का बसला आहे.

'व्हॅम्प' संस्थेनं आपल्या परिसरातील एका देहविक्रय करणाऱ्या स्त्रीचा 'करोना'मुळे मृत्यू झाला, असं  सांगितलं. पण ती आत्महत्या होती. भीतीपोटी के लेली. देहविक्रय करून आपला उदरनिर्वाह करणारी, सहा महिन्यांच्या बाळाचं संगोपन करणारी चौतीस वर्षांची आई. काम नाही, ग्राहक नाहीत, प्रियकर नाही. नव्वद टक्के भाजल्यामुळे तिचा मृत्यू झाला. नैराश्यानं तिचं जगण्याचं बळच नाहीसं केलं. अगदी आदल्या दिवशीच संगीता ही कार्यकर्ती तिला  भेटली होती. 'संग्राम' आणि 'व्हॅम्प' संघटनेच्या कार्यकर्त्यांनी निदान अन्नधान्य देऊन खाण्याचा प्रश्न लगेच मिटवू या, या उद्देशानं स्त्रियांना जीवनावश्यक शिधा देण्याची प्रक्रिया सुरू केली आणि

त्यासाठी सर्वेक्षण केलं होतं. या यादीत तिचंही नाव होतं. मात्र दुसऱ्या दिवशी मदत घेऊन जाण्याआधीच रात्री तिनं करोनाच्या संभाव्य भीतीपोटी आत्महत्या केली. सहा महिन्यांचं तिचं मूल कर्नाटकातील तिच्या मूळ गावी होतं. तिचं कुटुंबही तिकडेच अडकलेलं होतं. सारे कुटुंबीय गावी असल्यानं अंत्यसंस्कार तिकडेच करावा लागणार होता. तिच्या कुटुंबीयांना टाळेबंदीमुळे सांगलीपर्यंत येता येणं शक्य नव्हतं. त्यामुळे रुग्णवाहिकेबरोबर एकच व्यक्ती तिचा मृतदेह घेऊन तिच्या गावी पाठवावा लागला. अंत्यविधीसाठी एकत्र येण्यावर बंधनं आली, आणि आपला एवढा मोठा समाज पाठीशी असूनसुद्धा एकत्र येऊ शकला नाही, याची खंत संघटनेच्या प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनात कायमस्वरूपी रुजून बसली. 'करोना'च्या परिस्थितीसमोर सारेच हतबल झाले होते. या आणि अशा प्रसंगांमध्ये देहविक्रय करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनमानाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. टाळेबंदीमुळे गल्ली बंद झाली. धंदा बंद झाला आणि जगण्याचा संघर्ष सुरू झाला.

आपल्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी या स्त्रियांचं देहविक्रय हेच काम आहे. मात्र इतर कामांना ज्याप्रमाणे काम म्हणून मान्यता आहे, तशा प्रकारची मान्यता देहविक्रयाला अजूनही नाही. त्यामुळे या लोकांना सातत्यानं अस्तित्वाची लढाई लढावी लागते. टाळेबंदीचा देहविक्रय करणाऱ्यांवर काय परिणाम होत आहे हे समजून घेताना काही गोष्टी जाणून घेणं आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्यानं बघितलं तर देहविक्रय- ज्याला बोलीभाषेत आपण 'धंदा' म्हणतो, त्याला आपल्या देशात गुन्हेगारीच्या चौकटीमध्ये बसवलेलं आहे. यामुळे अनेक जण उदरनिर्वाहाचं साधन म्हणून हे काम छुप्या मार्गानं करत असताना आपण पाहतो. ज्या स्त्रिया देहविक्रय करत आहेत त्यांना अनेक प्रकारच्या कठीण प्रसंगांना सातत्यानं सामोरं जावं लागतं. समाजाच्या परिघावर राहणाऱ्या व्यक्ती म्हणून विविध पातळ्यांवर त्यांना संघर्ष करावा लागतो – यामध्ये मग आरोग्य सेवा, शिक्षण आणि न्यायव्यवस्थेचादेखील समावेश होतो, असा आमचा अनुभव आहे. संघटनेच्या बळावर गेल्या तीस वर्षांपासून 'संग्राम' आणि इतर संघटना- 'व्हॅम्प', 'मुस्कान', 'मित्रा' यांच्या साहाय्यानं या समाजाच्या प्रत्येक समस्येवर संघटितरीत्या लगेच प्रतिसाद देऊन तोडगा काढण्याची पद्धत वापरली जात आहे. तीच पद्धत आम्ही 'करोना'च्या बिकट परिस्थितीमध्येसुद्धा वापरली, वापरत आहोत.

देहविक्रय करणाऱ्यांचे प्रश्न समजून घेत असताना सर्वात पहिला प्रश्न आहे तो म्हणजे टाळेबंदीमुळे हे काम पूर्णपणे बंद आहे. ज्यांच्यावर 'धंदा' अवलंबून आहे अशा व्यक्तीचं येणं-जाणंच संपूर्णतः ठप्प झालं आणि परिणामी उत्पन्न मिळणं बंद झालं. आम्ही कार्यरत असणाऱ्या ठिकाणी जवळपास ५००० ते ६००० व्यक्ती देहविक्रयावर अवलंबून आहेत. या सर्वांचे मिळकतीचे मार्ग सध्या तरी पूर्णपणे बंद आहेत. देशभरातील आकडेवारी लाखाच्या घरात आहे. यात जे उघडपणे समोर आलेले नाहीत त्यांची आकडेवारी अधिक असू शकते. आजघडीला देहविक्रयाबरोबरच त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांचीदेखील परिस्थिती बिकट झाली आहे. विशेषतः या स्त्रियांची जी मुलं परगावी राहून शालेय शिक्षण घेत होती, ती टाळेबंदीमुळे आपापल्या घरी परतली आहेत. स्वतःबरोबर स्वतःच्या मुलांच्या राहण्याची सोय कुठं करायची, हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे. त्यांना मुलांचं संगोपन करणं मुश्कील होऊन बसलं आहे. अशी परिस्थिती सर्वच ठिकाणच्या वेश्या व्यवसायातील स्त्रियांची झालेली दिसून येत आहे. स्त्रियांप्रमाणेच बाहेर जाऊन नोकरी करतो, असं सांगून देहविक्रयातून उदरनिर्वाह करणारे काही पुरुषही आहेत. त्यांनादेखील आर्थिक संकटाला तोंड द्यावं लागत आहे. सरकारनं काही प्रमाणात शासकीय योजनेतून मदत करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यातून थोडयाफार तृतीयपंथीयांना फायदा झाला आहे. मात्र देहविक्रय करणाऱ्यांसाठी आतापर्यंत कोणत्याही प्रकारची योजना वा मदत जाहीर केलेली नाही. त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं गेलं आहे.

आम्ही काम करत असलेल्या क्षेत्रात काही वेश्या व्यवसायातील स्त्रिया अशा आहेत, की ज्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणं अत्यंत गरजेचं आहे. यामध्ये 'एचआयव्ही'बरोबर जगणाऱ्यांचे प्रश्न हाताळणं महत्त्वाचं वाटतं. मागील महिन्याभरात सरकारकडून उपलब्ध

होणाऱ्या 'एआरटी' नावाच्या औषधोपचार पद्धतीमधील 'थर्ड लाइन' प्रकारातील औषधं मिळवण्यासाठी न्यायालयाची पायरी चढावी लागली. 'फर्स्ट लाइन', 'सेकंड लाइन' या प्रकारातील औषधं वेळेत गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचवत असताना अनेक संकटांना तोंड द्यावं लागलं. संघटनेचे कार्यकर्ते मात्र सतत पाठपुरावा करत होते. वैयक्तिक पातळीवर सर्व प्रकारची सुरक्षितता पाळून घरात जाऊन औषधं देण्याचं धाडसी काम या कार्यकर्त्यांच्या जोरावर सुरू आहे. सध्या सर्वांच्या प्रयत्नांमुळे आणि संघटनेच्या बळकटीकरणामुळे आम्ही संस्था- संघटनांनी मिळून समाजातल्या लोकांकडून आर्थिक मदत, रेशन मिळवलं आहे. वेगवेगळ्या ठिकाणचे कार्यकर्ते तिथल्या देहविक्रय करणाऱ्यांच्या अडचणी जाणून घेत आहेत. त्यांच्यापर्यंत पोहोचून धान्य आणि शिधावाटपाचं काम करत आहेत. यामध्ये सध्या सांगली, सातारा, कोल्हापूर, अमळनेर, चोपडा, वैजापूर, पुणे, झारखंड, कर्नाटक या ठिकाणी वाटप केलं आहे. हे काम करत असताना सर्व ठिकाणचे जिल्हाधिकारी, पोलीस प्रमुख, तहसीलदार, वाहतूक अधिकारी, स्थानिक प्रशासकीय अधिकारी आदींचं सहकार्य लाभत आहे. हा तोडगा कायमस्वरूपी चालेल, असं सध्या तरी वाटत नसलं, तरी आम्ही प्रयत्न चालू ठेवले आहेत.

टाळेबंदीमुळे निर्माण झालेला पेचप्रसंग सरकारनं सोडवायला हवा. देहविक्रय करणाऱ्यांसाठी सरकारनं अधिक संवेदनशीलपणे योजना आणि धोरणांची बांधणी करणं अत्यंत गरजेचं वाटतं. केंद्र सरकारनं जाहीर केलेल्या एकाही योजनेत या लोकांना सामावून घेतलेलं नाही. तात्पुरत्या स्वरूपाच्या मदतीचा काही काळापुरताच दिलासा मिळू शकतो . वेश्या व्यवसायातील सर्व स्त्रिया श्रमजीवी असून त्यांच्या कामाला काम म्हणून दर्जा देऊन त्यांना सर्व प्रकारची मदत देशात मिळायला हवी. त्यासाठी सातत्यानं आमचे प्रयत्न चालू आहेत. आमचा लढा हा या व्यक्तींना 'लैंगिक कामगार' म्हणून दर्जा मिळावा यासाठी सुरू आहे, तो भविष्यातही राहील. गरज आहे ती समाजमन बदलण्याची आणि या लोकांना आपल्या समाजातीलच एक घटक म्हणून स्वीकारण्याची.

(लेखिका वेश्या व्यवसायातील स्त्रियांसाठी काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)
शब्दांकन — शांतीलाल काळे